# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १४२३/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.प्रशांत गणपत मोरे
मु.पो.रोठखुर्द, ता.रोहा,
जि.रायगड ४०२ ११६.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मालसई,
ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मालसई,
ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : २८/१०/२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/५/२०२२ | ---- | ५/७/२०२२ | २३/७/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१७/१०/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सांगडेबौध्दवाडी रस्त्यालगत पथ दिवे बसविणे या कामाची तसेच इस्टीमेंटच्या व कार्यारभ आदेशाच्या तसेच (M.B. रेकॉर्डीग) कामाच्या मोजणी पुस्तकांची प्रती सही शिक्या निशी मिळाव्यात एकूण कामाचा खर्च आकडेवारीत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२३/७/२०२२ रोजी, *" जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत मालसई यांनी सांगडे बौध्दवाडी रस्त्यालगत पथदिवे बसविणे या कामाची अर्जात नमुद केलेली ग्रा.पं.दप्तरी उपलब्ध असणारी माहिती अपिलार्थी यांना १० दिवसात देण्यात यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आली नाही.

जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील सुनावणीस अनुपस्थित आहेत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रश्मी वेटकोळी, ग्रामसेवक ग्रामपंचायत मालसई यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४/५/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१/१२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

Comp-३

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रश्मी वेटकोळी, ग्रामसेवक ग्रामपंचायत मालसई – **यांना प्रत**
--विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मालसई,
ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९ **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. दि.२८/१०/२०२५ रोजीच्या आदेशानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास केलेल्या विलंबाबाबत खुलासा करणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्या आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत व त्यांनी खुलासा देखील केलेला नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मालसई यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४/५/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानंतर अद्यापपर्यंत देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा वेटकोळी, ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मालसई यांनी आयोगास कोणताही खुलासा सादर केलेला नाही तसेच त्या आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत, यावरून त्यांना खुलासा करावयाचा नाही असे दिसून येते. यास्तव त्यांना दि.२८/१०/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **गट विकास अधिकारी, पंचायत समिती रोहा** यांनी आयोगास सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१२/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती रोहा,
ता.रोहा जि.रायगड
४) आस्थापना अधिकारी/ आहरण व संवितरण अधिकारी,
पंचायत समिती रोहा, ता.रोहा जि.रायगड
५) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा वेटकोळी, ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत मालसई, ता.रोहा जि.रायगड

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा वेटकोळी, ग्रुप ग्रामपंचायत मालसई उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी आज दि.१२/१/२०२६ रोजीच्या पत्राव्दारे आयोगास कळविले आहे की, मी अर्जदार श्री.प्रशांत गणपत मोरे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत मालसई ता.रोहा जि.रायगड ४०२१०९ माझा तक्रार क्रमांक १४२३/२०२२ सदरचा तक्रारी अर्ज मी मागे घेत आहे माझी कोणतीही तक्रार नाही.

परंतु याप्रकरणी आयोगाने सुनावणी घेऊन दंड आकारणीचे आदेश पारीत केलेले असल्याने, आता तक्रारकर्ता यांनी तक्रार मागे घेणेबाबत सादर केलेले निवेदन ग्राहय धरता येत नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा वेटकोळी ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मालसई या उपस्थित आहेत. त्यांनी अद्यापही तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली नाही. दि.२३/७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती रोहा यांनी जन माहिती अधिकारी यांना १० दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले होते. या आदेशानंतर देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी आयोगासमोर तक्रार दाखल केली. दि.२८/१०/२०२५ रोजी तक्रारीच्या सुनावणीदरम्यान आयोगाने १५ दिवसात जलद टपालाने माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानंतर दि.१/१२/२०२५ रोजी तत्कालिन जन माहिती अधिकारी म्हणून श्रीमती रेश्मा वेटकोळी यांचेवर रू.२५००० शास्ती लादण्यात आली. तरी देखील श्रीमती रेश्मा वेटकोळी यांनी तक्रारकर्ता यांना अद्याप माहिती दिली नाही.

तत्कालिन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी हे वेगळे असतील असे समजून आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी देखील श्रीमती रेश्मा वेटकोळी याच आहेत असे आज सुनावणीदरम्यान लक्षात आले त्यामुळे त्यांचेवर पुन्हा शास्ती आकारणी करता येणार नाही.

परंतु याप्रकरणी श्रीमती रेश्मा वेटकोळी यांचे वर्तन हे आपत्तीजनक आहे त्यांनी तक्रारकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती दिली नाहीच तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे आदेशानंतर देखील माहिती दिली नाही. त्यानंतर आयोगाच्या आदेश झाल्यानंतर सुध्दा अद्यापपर्यंत माहिती दिली नाही. त्यांचेविरूध्द रू.२५००० इतकी शास्ती त्यामुळे आयोगाला आकारावी लागली, परंतु त्याचाही काही परिणाम श्रीमती रेश्मा वेटकोळी यांचेवर झाला नाही त्यांनी अद्यापपर्यंत तक्रारकर्तास माहिती दिली नाही.

एकूणच श्रीमती रेश्मा वेटकोळी यांची या प्रकरणातील भूमिका ही माहिती न देण्याची असल्याचे दिसून येते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. गट विकास अधिकारी पंचायत समिती रोहा यांना निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी याप्रकरणी तक्रारकर्ता यांना माहिती देण्यास जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा वेटकोळी, ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मालसई यांनी केलेल्या विलंबासाठी तसेच आयोगाच्या आदेशानंतर देखील माहिती न दिलेबाबत त्यांचेविरूध्द विभागीय चौकशीची कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सुनावणीस सादर करावा.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२६/२/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ जानेवारी २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती रोहा,
ता.रोहा जि.रायगड

Comp-३